पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १४९ व्या ऑनलाईन बैठकीचा कार्यवृत्तांत
## बुधवार, दि. ३० नोव्हेंबर, २०२२ दुपारी ०३:०० वा.



प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १४९ वी बैठक बुधवार, दि. ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी दुपारी ०३:०० वा. मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Applicatioin द्वारे व्हिडिओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली होती.

Google Meet Applicatioin द्वारे व्हिडिओ कॉन्फरन्सने खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | डॉ. राजेश गादेवार, प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | डॉ. अ. उ. उबाळे, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| ४) | सीए श्रेणीक शहा - वित्त व लेखा अधिकारी (निमंत्रित) | निमंत्रित |
| ५) | डॉ. शि. सु. गणपूर - संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ (निमंत्रित) | निमंत्रित |
| ६) | श्रीमती योगिनी घारे - कुलसचिव | सदस्य-सचिव |

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

डॉ. शैलेंद्र देवळाणकर, मा. प्रभारी शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व डॉ. द. व्यं. जाधव, विभागीय सहसंचालक, (तंत्र शिक्षण), पुणे हे अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

विषय क्र.१
1. दि. ०७ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.
2. दि. १८ नोव्हेंबर, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १४८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

कुलसचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या दि. ०७ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या १४७ व्या व दि.१८ नोव्हेंबर, २०२२ रोजी झालेल्या तातडीच्या १४८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव | १) दि. ०७ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.<br>२) दि. १८ नोव्हेंबर, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १४८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला. |

विषय क्र.२ प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ (एकत्रित वेतन, कुशल, अर्धकुशल व अकुशल) घेण्याकरिता वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांच्या दरपत्रक समितीने दिलेल्या अहवालातील ठराव क्र.३ मध्ये केलेल्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु. ०१ या दराने दि.०१/११/२०२२ पासून ३०/०९/२०२३ या कालावधीकरिता अ.क्र.३ वर असलेले फर्म मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर या खाजगी कंत्राटदारास पुरवठा आदेश देणेबाबत तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

टिपणी: वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाने दि.०६/०८/२०२२ व दि.१७/०८/२०२२ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठीचा ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. तसेच विभागाने सर्व ई-निविदा प्रक्रिया करुन तज्ज्ञ समितीच्या अहवालानुसार क्रमवारी निश्चित केल्याप्रमाणे L-१ असलेल्या फर्म मे. यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादन संस्था मर्या, नाशिक या फर्मने सेवा पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली होती. तद्नंतर सदर समितीच्या अहवालातील ठराव क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे समितीने निश्चित केलेले क्रमवारीमधील अ. क्र.२ मध्ये असलेले मे. राजश्री शाहू नागरी सेवा सहकारी संस्था मर्या, पालघर या फर्मने दि.०१/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरवठा करण्याबाबत असमर्थता दर्शविल्यामुळे समितीच्या अहवालातील ठराव क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे समितीने निश्चित केलेले क्रमवारीमधील अ.क्र.३ मध्ये असलेले मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर या फर्मने दि.०८/०९/२०२२ रोजीच्या ई-मेलद्वारे काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. तसेच सदर फर्मने दि.०८/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दराबाबत स्विकृती कळविली आहे. त्यानुसार प्रथमत: मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर या खाजगी कंत्राटदाराकडून भारतीय गैरन्यायिक मुद्रांक रुपये ५००/- वर करारनामा व अनामत रक्कम बँक गॅरंटी स्वरुपात जमा करुन घेण्याबाबत प्रशासकीय मान्यता घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ (एकत्रित वेतन, कुशल, अर्धकुशल व अकुशल) घेण्याकरिता वित्त व लेखा (खरेदी व

भांडार) विभाग यांच्या दरपत्रक समितीच्या ठराव क्र.३ मध्ये केलेल्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु. ०१.०० या दराने दि.०१/११/२०२२ पासून ३०/०९/२०२३ या कालावधीकरिता मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर या खाजगी कंत्राटदारास पुरवठा आदेश देणेबाबत प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यास तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी दि.१९/१०/२०२२ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संबंधित फर्मला दि.२१/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये पुरवठा आदेश निर्गमित केलेल्या कार्यवाहीची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ (एकत्रित वेतन, कुशल, अर्धकुशल व अकुशल) घेण्याकरिता वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांच्या दरपत्रक समितीने दिलेल्या अहवालातील ठराव क्र.३ मध्ये केलेल्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु. ०१ या दराने दि.०१/११/२०२२ पासून ३०/०९/२०२३ या कालावधीकरिता अ.क्र.३ वर असलेले फर्म मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर या खाजगी कंत्राटदारास पुरवठा आदेश देणेबाबत तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

**विषय क्र.३ वेळेत सुरक्षा ठेव भरुन वार्षिक दरकरार न केल्यामुळे तसेच कोणताही प्रतिसाद न दिल्याने श्री. गणेश एजन्सीज, सोलापूर या फर्मला अपात्र करुन बयाणा रक्कम जप्त करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: संदर्भ –

१. जा.क्र. पुअहोसोविसो/विवले/४१२, दि.०४/०८/२०२२ रोजीचे दर स्वीकृती बाबतचे पत्र.

२. जा.क्र. पुअहोसोविसो/विवले/४३८, दि.१८/०८/२०२२ रोजीचे स्मरणपत्र क्र. १.

३. श्री. गणेश एजन्सीज यांचे दि.२०/०८/२०२२ रोजीचे पत्र.

४. जा.क्र. पुअहोसोविसो/विवले/४४७, दि.२३/०८/२०२२ रोजीचे स्मरणपत्र क्र. २.

५. जा.क्र. पुअहोसोविसो/विवले/४७०, दि.०६/०९/२०२२ रोजीचे स्मरणपत्र क्र. ३.

प्रस्तुत विद्यापीठातील प्रशासकीय विभाग व संकुलांकरिता लेखन सामुग्री व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता एकूण ४ फर्मसोबत वार्षिक दरकरार करण्यात आला होता. सदर दरकराराचा कालावधी फेब्रुवारी, २०२२ मध्ये संपुष्टात आला आहे.

नव्याने दरकरार करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करुन खरेदी समिती, वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषद यांची मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार, (१) मे. यश एंटरप्राईजेस, मुंबई (२) मे. आय. पी. एंटरप्राईजेस, सोलापूर (३) मे. श्रीगणेश एजन्सीज्, सोलापूर या तीन फर्मचे दर न्यूनतम असल्याने या तीन फर्मला सुरक्षा ठेव भरुन वार्षिक दरकरार करण्याबाबत अनुक्रमे जा.क्र. ४१४, ४१३ व ४१२ नुसार संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. यापैकी अ.क्र. (१) व (२) फर्मनी सुरक्षा ठेव भरुन वार्षिक दरकराराची कार्यवाही दि.०८/०८/२०२२ रोजी पूर्ण केली आहे.

मे. श्रीगणेश एजन्सीज्, सोलापूर यांनी संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये सुरक्षा ठेव भरुन वार्षिक दरकराराची कार्यवाही वेळेत पूर्ण न केल्याने त्यांना संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये (स्मरणपत्र क्र.१) याबाबत विचारणा करण्यात आली. त्यानुसार, मे. श्रीगणेश एजन्सीज्, सोलापूर यांनी त्यांच्या संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये त्यांनी संदर्भ क्र.१ चे पत्र अद्याप प्राप्त झाले नाही व दरकराराचे स्वीकृती पत्र मिळावे आणि तुलनात्मक तक्ता तसेच बाबनिहाय यादीची प्रत मिळण्याबाबत विनंती केली होती.

मे. श्रीगणेश एजन्सीज्, सोलापूर यांना संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये सुरक्षा ठेव भरुन वार्षिक दरकरार करण्याची कार्यवाही दि.२६/०८/२०२२ पर्यंत पूर्ण करण्याबाबत यानंतर संदर्भ क्र.४ व ५ च्या पत्रान्वये सुरक्षा ठेव भरुन वार्षिक दरकरार करण्याची कार्यवाही दि.०८/०९/२०२२ पर्यंत पूर्ण करावी अन्यथा आपणांस काही स्वारस्य नाही असे समजून अपात्र करण्यात येईल व आपली बयाणा रक्कम जप्त करुन आपणांस काळ्या यादीत टाकण्यात येईल व होणाऱ्या कारवाईस आपण स्वत: जबाबदार आहात याची गंभीरतेने दखल घ्यावी असे कळविले होते.

दि.१२/०९/२०२२ पर्यंत मे. श्रीगणेश एजन्सीज्, सोलापूर यांच्याकडून कोणताच

प्रतिसाद मिळत नसल्याने स्वत: मा. वित्त व लेखा अधिकारी यांनी भ्रमणध्वनीद्वारे संबंधितांशी संपर्क साधला असता, त्यांनी दि.१२/०९/२०२२ रोजी सायंकाळी ०५:३० वाजेपर्यंत समक्ष येवून सुरक्षा ठेव भरुन वार्षिक दरकराराची कार्यवाही पूर्ण करतो असे सांगितले. परंतु त्यांनी विद्यापीठात येवून सुरक्षा ठेव भरुन वार्षिक दरकरार करण्याची कार्यवाही पूर्ण केलेली नाही. उलट त्यांनी दि.१३/०९/२०२२ रोजी ई-मेल पाठवून दरस्वीकृतीचे पत्र मिळाले नाही व ते पाठविण्यात यावे अशी विनंती केली.

विद्यापीठाने संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये मे. श्रीगणेश एजन्सीज्, सोलापूर यांना दर स्वीकृतीचे पत्र बाबनिहाय साहित्याची यादी पाठविलेली आहे. मे. श्रीगणेश एजन्सीज्, सोलापूर यांना संदर्भ क्र. १, २, ४ व ५ नुसार विहित मुदतीत सुरक्षा ठेव भरुन वार्षिक दरकराराची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यास अद्यापपर्यंत कसलाच प्रतिसाद न दिल्यामुळे वार्षिक दरकराराची कार्यवाही पूर्ण करता आली नाही. सध्या विद्यापीठाकडे सदर फर्मला मंजूर असलेल्या विविध स्टेशनरी साहित्याचा तुटवडा जाणवत असून यामुळे विद्यापीठास कामे पूर्ण करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. ही बाब विद्यापीठाच्या दृष्टीने अतिशय गंभीर असून, झेरॉक्स पेपर ए-४ साईज ७० जी. एस. एम. व इतर साहित्यांचे बाजारातील प्रत्यक्ष दर व फर्मने दिलेले दरपत्रकातील दर यामध्ये खूप मोठी तफावत असल्यामुळे साहित्याचा पुरवठा करताना मोठा तोटा होणार असल्याने सदर फर्म जाणीवपूर्वक व हेतूपुरस्पर सुरक्षा ठेव भरुन वार्षिक दरकरार करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे व संदर्भ क्र.१ येथील पत्र दि.०४/०८/२०२२ पासून आजतागायत काहीच प्रतिसाद अथवा त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही यावरुन सदर फर्मला सुरक्षा ठेव भरुन वार्षिक दरकरार करण्यास काहीच स्वारस्य नाही असे समजून या प्रक्रियेमधून अपात्र करण्यास व बयाणा रक्कम रु.३०,०००/- जप्त करणे उचित वाटते. सध्या व्यवस्थापन परिषदेची बैठक नियोजित नसल्यामुळे व मे. श्रीगणेश एजन्सीज्, सोलापूर यांना अपात्र केल्याशिवाय त्यांना मंजूर झालेले साहित्य नव्याने प्रक्रिया करुन खरेदी करता येवू शकत नाही. यास्तव मे. श्रीगणेश एजन्सीज्, सोलापूर यांना तातडीने अपात्र करणे आवश्यक आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती व विद्यापीठास जाणवत असलेला स्टेशनरीचा तुटवडा विचारात घेता तसेच स्टेशनरीची खरेदी प्रक्रिया नव्याने तातडीने करण्याकरिता मे. श्रीगणेश एजन्सीज्, सोलापूर यांची बयाणा रक्कम रु.३०,०००/- जप्त करुन त्यांना या प्रक्रियेतून अपात्र करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) नुसार तातडीची बाब म्हणून मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

सबब, सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.

| ठराव : | **वेळेत सुरक्षा ठेव भरुन वार्षिक दरकरार न केल्यामुळे तसेच कोणताही प्रतिसाद न दिल्याने श्री. गणेश एजन्सीज, सोलापूर या फर्मला अपात्र करुन बयाणा रक्कम जप्त करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र.४ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र व FLOA, पुणे यांच्यात ०२ अभ्यासक्रमांसाठी सामंजस्य करार (MoU) करण्यास तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषेदच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र अंतर्गत FLOA, पुणे या संस्थेने खालीलप्रमाणे ०२ अभ्यासक्रम Online पध्दतीने त्यांच्या कार्यक्षेत्रात सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

| Sr. No. | Institute Name | Course Name |
|---|---|---|
| 1. | FLOA, Pune | 1. Basic Certificate Course in Foreign Language Learning (3 Months)<br>2. Diploma Course in Foreign Language Learning (1 Year) |

सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र व FLOA, पुणे यांच्यात ०२ अभ्यासक्रमांसाठी सामंजस्य करार (MoU) करण्यास तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषेदच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

| ठराव : | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र व FLOA, पुणे यांच्यात ०२ अभ्यासक्रमांसाठी सामंजस्य करार (MoU) करण्यास तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषेदच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र.५ भारती विद्यापीठ, सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या सामंजस्य कराराची बाब विचारार्थ.**

टिपणी: भारती विद्यापीठ, सोलापूर यांचेकडून प्राप्त ई-मेल द्वारे सामंजस्य कराराबाबत पत्र प्राप्त झाले होते. या करारामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे.

1. The Exchange of Academic Materials
2. Conducting Lectures
3. Undertaking joint research etc.

वरीलप्रमाणे भारती विद्यापीठ, सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यातील सामंजस्य कराराबाबतची कागदपत्रे प्रस्तुत विद्यापीठातील कायदा अधिकारी यांच्याकडून तपासणी करुन घेतलेली असून सदरच्या सामंजस्य कराराचा मसुदा व कराराची संबंधीची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **भारती विद्यापीठ, सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यास व कराराच्या मसुद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.६ Winning Leap Education Pvt. Ltd. (Herein referred to as Learn Qoch), Mumbai व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या सामंजस्य कराराची बाब विचारार्थ.**

टिपणी: Winning Leap Education Pvt. Ltd. (Herein referred to as Learn Qoch), Mumbai यांचेकडून प्राप्त ई-मेल द्वारे सामंजस्य कराराबाबत पत्र प्राप्त झाले होते. सामंजस्य कराराबाबतची कागदपत्रे प्रस्तुत विद्यापीठातील कायदा अधिकारी यांच्याकडून तपासणी करुन घेतलेली असून मा. कायदा अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे सामंजस्य करारामध्ये बदल केलेले आहेत (मुद्दा क्र. ७.७ व ७.८). सबब, सदरच्या सामंजस्य कराराचा मसुदा व कराराची संबंधीची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **Winning Leap Education Pvt. Ltd. (Herein referred to as Learn Qoch), Mumbai व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यास व कराराच्या मसुद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.७ प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुलातील नियमित पदावर कार्यरत अध्यापकांचे कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A पदोन्नतीकरिता राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके तज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ नियमित पदावर कार्यरत अध्यापकांचे कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ नुसार गठीत करावयाच्या Selection Committee मधील क्र. v नुसार ज्या विषयासाठी अध्यापकांची निवड करावयाची असेल अशा विषयाचे विशेष ज्ञान असलेल्या, विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेल तीन पेक्षा अधिक नसतील इतक्या तज्ज्ञांची निवड करावयाची तरतूद विशद केली आहे.

त्यानुसार प्रस्तुत विद्यापीठातील कॅस अंतर्गत पदोन्नतीची पुढील प्रक्रिया पार पाडण्यासाठी पत्रकारिता व जनसंज्ञापन या विषयासाठी विद्यापीठाबाहेरील विषय तज्ज्ञांची आवश्यकता असल्याने, प्रस्तुत विद्यापीठाचे आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता यांचेकडून सदर विषयाची यादी मागविण्यात आली असून, त्यांनी संबंधित विषयातील सहा विषय तज्ज्ञांची यादी दिलेली आहे.

त्यानुषंगाने सदर विषय तज्ज्ञांची यादी विद्यापरिषदेच्या दि.०३/१०/२०२२ रोजीच्या बैठकीत विषय क्र. २२ अन्वये विषय विचारार्थ ठेवला असता, त्यावर पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

"प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुलातील नियमित पदावर कार्यरत अध्यापकांचे कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A पदोन्नतीकरिता राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा विषय तज्ज्ञांची नावे व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्याबाबत विद्यापरिषदेच्या वतीने नामनिर्देशन करण्याबाबतचे सर्वाधिकार मा.कुलगुरु महोदयांना देण्याचे सर्वानुमते ठरले."

सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुलातील नियमित पदावर कार्यरत अध्यापकांचे कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A पदोन्नतीकरिता राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा विषय तज्ज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके विषय तज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.

| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुलातील नियमित पदावर कार्यरत अध्यापकांचे कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A पदोन्नतीकरिता राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके तज्ज्ञ नामनिर्देशन करण्यास मा.कुलगुरु महोदयांना सर्वाधिकार देण्याचे सर्वानुमते ठरले.** |
|---|---|

**विषय क्र.८ प्रस्तुत विद्यापीठात "छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र" सुरु करणेकामी शासनास पाठवावयाच्या प्रस्तावासाठी गठीत केलेल्या समितीने तयार केलेला प्रस्तावाचा मसूदा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३(१)(च) नुसार विद्यापरिषदेने केलेली शिफारस कलम ३१(घ) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात "छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र" सुरु करण्यासंदर्भात दि. ३० एप्रिल, २०१९ च्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. १० वर पारित झालेल्या ठरावानुसार तसेच प्रस्तुत कार्यालयाच्या दि. २२/०१/२०२१ रोजीच्या सादरीकरणास मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या मान्यतेनुसार छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचा शासनास पाठविण्यात येणाऱ्या प्रस्तावाचा मसूदा तयार करणेकामी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दि.१९/०९/२०२२ रोजीच्या बैठकीत अध्यासन केंद्राचा अंतिम मसूदा प्रस्तुत कार्यालयास सादर केला असून, सदर मसूद्याचे अवलोकन करुन मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या बैठकीत ठेवण्यास मान्यता प्रदान केली आहे.

त्यानुषंगाने "छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र" प्रस्तावाचा मसूदा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३३(१)(च) नुसार विद्यापरिषदेच्या दि.०३/१०/२०२२ रोजीच्या बैठकीत विषय क्र.२१ अन्वये विषय विचारार्थ ठेवला असता, त्यावर पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

"प्रस्तुत विद्यापीठात "छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र" सुरु करणेकामी शासनास पाठवावयाच्या प्रस्तावासाठी गठीत केलेल्या समितीने तयार केलेला मसूदा स्विकारुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३(१)(च) नुसार सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."

सबब, प्रस्तुत विद्यापीठात "छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र" सुरु करणेकामी शासनास पाठवावयाच्या प्रस्तावासाठी गठीत केलेल्या समितीने तयार केलेला मसूदा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३(१)(च) नुसार विद्यापरिषदेने केलेली शिफारस कलम ३१(घ) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठात "छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र" सुरु करणेकामी शासनास पाठवावयाच्या प्रस्तावासाठी गठीत केलेल्या समितीने तयार केलेला प्रस्तावाचा मसूद्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३(१)(च) नुसार विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.९ शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विविध संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांना अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र/कार्यशाळा आयोजनाकरिता आर्थिक सहाय्य करणेसंदर्भात शिफारस करणेकरिता मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीची बैठक दि.१६/११/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती, सदर समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी/पडताळणी करुन सादर केलेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत व या संदर्भात नव्याने तयार करण्यात आलेली नियमावली विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातंर्गत सर्व संलग्नित महाविद्यालये व संकुलाकडून आंतरराष्ट्रीय /राष्ट्रीय/राज्य/विभागीय व विद्यापीठ पातळीवर अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र, कार्यशाळा व परिषदा आयोजनाकरिता प्रतिवर्षी प्रस्ताव मागविण्यात येतात. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/राज्य व विभागीय पातळीवर चर्चासत्र, कार्यशाळा, परिषद (Seminar, Workshop & Conference) आयोजनाबाबत व त्याकरिता होणाऱ्या खर्चापोटी विद्यापीठ नियमानुसार काही अंशी आर्थिक सहाय्य अनुदान रक्कम देणेकरिता विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/अमंवि/२०२२/७७९७, दि.२८ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व संकुलाकडून विहित मुदतीत दि.२०/१०/२०२२ पर्यंत दिलेल्या नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार एकूण १२३ प्रस्ताव देण्यात आलेल्या विहित मुदतीत प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी पात्र महाविद्यालये व संकुलाना अनुदान सहाय्य रक्कम आदा करण्यासाठी मा. कुलगुरु महोदया यांनी अभ्यासमंडळे विभागाच्या दि.२९/१०/२०२२ रोजीच्या टिपणीवर नामनिर्देशन केल्यानुसार समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीची बैठक दि.१६/११/२०२२ रोजी विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.

उपरोक्त समितीने एकूण १२३ प्रस्तावांची छाननी/पडताळणी केली असता त्यापैकी ४२ पात्र प्रस्तावांना आर्थिक सहाय्य रक्कम देण्याकरिता शिफारस केलेली असून ८१ प्रस्ताव अनुदान सहाय्य देणेसाठी अपात्र करुन यादी कार्यालयास सादर केली आहे. सदर बैठकीचा कार्यवृत्तांत मा. व्यवस्थापन परिषदेच्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडला आहे.

अनुदान पात्र करण्यात आलेल्या एकूण ४२ प्रस्तावांमध्ये समितीने दि.१४/०९/२०२२ रोजी तयार करण्यात आलेल्या नियमावलीनुसार तसेच उपलब्ध असलेल्या शेष रक्कमेप्रमाणे अनुदान सहाय्य रक्कमेची शिफारस केलेली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विविध संलग्नित महाविद्यालयांना व विद्यापीठ परिसर संकुलांना अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र/कार्यशाळा आयोजनाकरिता आर्थिक सहाय्य देणे संदर्भात शिफारस करणेकरिता मा. कुलगुरु महोदया यांनी गठीत केलेल्या समितीने सादर केलेला बैठकीचा कार्यवृत्तांत व या संदर्भात नव्याने तयार करण्यात आलेली नियमावली विचारार्थ.

| ठराव : | **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विविध संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांना अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र/कार्यशाळा आयोजनाकरिता आर्थिक सहाय्य करणेसंदर्भात मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी/पडताळणी करुन सादर केलेला बैठकीचा कार्यवृत्तांत व या संदर्भात नव्याने तयार करण्यात आलेली नियमावली स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र. १०** **राज्यस्तरीय युवा महोत्सव, पश्चिम विभागीय युवा महोत्सव व राष्ट्रीय युवा महोत्सवात वादक, गायक व प्रशिक्षकांना ठरलेल्या प्रती दिन प्रती व्यक्ती प्रमाणे मानधन आदा करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: राज्यस्तरीय इंद्रधनुष्य, पश्चिम विभागीय व राष्ट्रीय युवा महोत्सवात प्रत्येकी ४० विद्यार्थ्यांचा संघ सामिल होत असतो. उपरोक्त महोत्सवात चांगल्या प्रकारे सादरीकरण व्हावे या दृष्टीकोनातून युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या विद्यार्थी कलाकारांसाठी १५ दिवस सराव शिबिराचे आयोजन करण्यात येते. सरावा दरम्यान संगीत व विविध कलाप्रकारात साथ-संगत करण्यासाठी व विविध कलाप्रकारात निपुण करण्यासाठी प्रशिक्षकाची आवश्यकता असते. तरी खालील विविध कलाप्रकारासाठी वादक व प्रशिक्षक सोबत घेवून सराव व युवा महोत्सवात सादरीकरण करावे लागते. तरी सराव शिबिराचे एकुण १५ दिवस व इंद्रधनुष्य, पश्चिम विभागीय तसेच राष्ट्रीय युवा महोत्सव या तिन्ही युवा महोत्सवातील ५ दिवस सादरीकरणाचे असे एकूण २० दिवसाचे मानधन वादक, गायक व प्रशिक्षकांना आदा करणे आवश्यक आहे. तरी एकुण २० दिवसांसाठी प्रति दिन नुसार खालीलप्रमाणे मानधन आदा करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

| विविध कला प्रकारासाठी वादक व गायकाचे मानधन - अ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | वाद्याचा तपशील | प्रत्येकी युवा महोत्सवातील सराव व सादरीकरणाचे एकुण दिवस | सन २०१६ ते आजतागायत देण्यात आलेले प्रति दिन मानधन | एकुण आदा करण्यात येणारे मानधन | शिफारस करण्यात आलेले प्रति दिन मानधन | एकुण मानधन |
| १) | ढोलकी वादक | २० | ५००/- | १०,०००/- | ७००/- | १४,०००/- |
| २) | पेटी वादक | २० | ५००/- | १०,०००/- | ७००/- | १४,०००/- |
| ३) | तबला वादक | २० | ५००/- | १०,०००/- | ७००/- | १४,०००/- |
| ४) | ढोलक वादक | २० | ५००/- | १०,०००/- | ७००/- | १४,०००/- |
| ५) | संबळ वादक | २० | ५००/- | १०,०००/- | ७००/- | १४,०००/- |
| ६) | बासरी वादक | २० | ५००/- | १०,०००/- | ७००/- | १४,०००/- |
| ७) | गायक - १ | २० | ४५०/- | ९,०००/- | ५००/- | १०,०००/- |
| ८) | गायक - २ | २० | ४५०/- | ९,०००/- | ५००/- | १०,०००/- |
| | एकूण | | | ७८,०००/- | -- | १,०४,००० |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| विविध कला प्रकारासाठी प्रशिक्षकाचे मानधन - ब | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | कलाप्रकाराचे नाव | सराव व सादरीकरणाचे एकुण दिवस | सन २०१६ ते आजतागायत देण्यात आलेले प्रति दिन मानधन | एकुण आदा करण्यात येणारे मानधन | शिफारस करण्यात आलेले प्रति दिन मानधन | एकुण मानधन |
| १) | शास्त्रीय नृत्य | २० | ३००/- | ६,०००/- | ७००/- | १४,०००/- |
| २) | शास्त्रीय नृत्य वादक, गायक | २० | ३००/- | ६,०००/- | ७००/- | १४,०००/- |
| ३) | लोकनृत्य | २० | ५५०/- | ११,०००/- | ७००/- | १४,०००/- |
| ४) | संगीत | २० | ५५०/- | ११,०००/- | ७००/- | १४,०००/- |
| ५) | एकांकिका | २० | ३००/- | ६,०००/- | ५००/- | १०,०००/- |
| ६) | लघुनाटिका | २० | ३००/- | ६,०००/- | ४००/- | ८,०००/- |
| ७) | मुकनाट्य | २० | ३००/- | ६,०००/- | ४००/- | ८,०००/- |
| ८) | ललीत ८ कलाप्रकार | २० | ५००/- | १०,०००/- | ७००/- | १४,०००/- |
| एकूण २० दिवसाचे प्रशिक्षकाचे मानधन | | | | ६२,०००/- | -- | ९६,०००/- |
| अ) प्रमाणे वादक व गायकाचे ब) प्रमाणे प्रशिक्षकाचे एकुण मानधन रु. २,००,०००/- | | | | | | |

उपरोक्त शिफारशीनुसार दर विचारात घेता वादक, गायक व प्रशिक्षक यांना १५ दिवस सरावशिबिरा दरम्यान व ५ दिवस युवा महोत्सवात सादरीकरणासाठी असे २० दिवसासाठी प्रती दिन प्रती व्यक्तीप्रमाणे मानधनापोटी रु.२,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असुन सदरचा खर्च Youth Festival या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली खर्ची टाकावा लागणार आहे.

| अंदाजपत्रकीय शिर्षक | तरतुद | आज रोजी खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|
| Youth Festival | रु.२५,००,०००/- | रु.१४,००,०००/- | रु.११,००,०००/- |

तरी भविष्यात होणाऱ्या इंद्रधनुष्य पश्चिम विभागीय युवा महोत्सव तसेच राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी उपरोक्त पैकी "अ" रकाण्यातील नमुद केलेल्या वादकापैकी आवश्यकतेनुसार नेमणूक केलेल्या वादक, गायक व रकाना "ब" प्रमाणे सर्वप्रशिक्षक यांना रक्कम आदा करण्याची बाब विचारार्थ.

| ठराव : | **राज्यस्तरीय युवा महोत्सव, पश्चिम विभागीय युवा महोत्सव व राष्ट्रीय युवा महोत्सवात वादक, गायक व प्रशिक्षकांना ठरलेल्या प्रती दिन प्रती व्यक्ती प्रमाणे मानधन आदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय क्र.११ सन २०२२-२३ मध्ये नवीन बजेट हेड तयार करुन अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली तरतूद करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने "उत्कर्ष" सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव दि.१०/०१/२०२३ ते दि.१३/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठामध्ये आयोजित करण्याचे योजिले आहे. तरी सदरच्या महोत्सव कार्यक्रमाकरिता शासनाकडून रक्कम रु.२,६६,०००/- इतके अनुदान मंजूर करण्यात आले असून सदरचे अनुदान विद्यापीठास प्राप्त होणार आहे. उत्कर्ष महोत्सवाकरिता शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान रक्कम रु.२,६६,०००/- जमा करुन घेण्याकरिता प्रस्तुत विद्यापीठाच्या Development Budget Part-I Revised Budget Estimate २०२१-२२ and Budget Estimate for २०२२-२३ राष्ट्रीय सेवा योजना मध्ये "उत्कर्ष" या नावाचे नवीन बजेट हेड तयार करावे लागणार आहे. तरी उत्कर्ष या नावाने नवीन बजेट हेड तयार करण्यास तसेच शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान रक्कम रु.२,६६,०००/- हे आयोजनासाठी अपुरे पडणार असून सदरच्या महोत्सवाकरिता वाढीव अंदाजे रु.७,९४,०००/- इतकी विद्यापीठ फंडातून तरतूद करावी लागणार आहे. तरी उत्कर्ष महोत्सवाकरिता तयार करण्यात येणारे "उत्कर्ष" बजेट हेडखाली सोबत जोडल्याप्रमाणे वेगवेगळे हेड तयार करण्यास व एकुण रक्कम रु.१०,६०,०००/- मधून वेगवेगळ्या हेडमध्ये Provision करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **सन २०२२-२३ मध्ये "उत्कर्ष" या नावाने नवीन बजेट हेड तयार करुन अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली त्या अंतर्गत वेगवेगळे हेड तयार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**मा.कुलगुरु तथा अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय**

| | |
|---|---|
| **विषय क्र. १२(१)** | **डॉ. विश्वनाथ कराड यांना डी. लिट (D.Lit.) या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबत अधिसभेस शिफारस करण्याची बाब विचारार्थ.** |

टिपणी: ख्यातनाम व्यक्तींनी त्यांच्या क्षेत्रात केलेल्या समाजोपयोगी व इतर कार्याची नोंद घेवून त्यांना मानद पदवीने सन्मानित करण्याचा जगभरातील विद्यापीठांना मिळालेला एक शैक्षणिक विशेष अधिकार आहे. त्याअनुषंगाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेला १८ वर्षे पूर्ण झालेली आहेत आणि आतापर्यंत या विद्यापीठाने सन २०१७ मध्ये ना. श्री. सुशीलकुमार संभाजीराव शिंदे यांना डी.लिट. (D.Litt.) आणि डॉ. रघुनाथ माशेलकर यांना डी.एस्सी. (D.Sc.) या मानद पदवीने सन्मानित केलेले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२९ तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार - ब, दि. १०/१०/२०१८ मधील परिनियम ३(१) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी महामहीम कुलपती तथा राज्यपाल यांच्याकडे डॉ.विश्वनाथ कराड यांना डी.लिट (D.Lit.) या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबतचा प्रस्ताव सदर केलेला आहे. महामहीम राज्यपालांचे सचिव यांचे पत्र क्र. RB/PAHSU-२०२२/CR-२९४/Edu-१/१३५१, दि.२३/११/२०२२ अन्वये महामहीम कुलपती तथा राज्यपाल महोदयांनी डॉ. विश्वनाथ कराड यांना डी.लिट (D.Lit.) या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबतचा मान्यता दिलेली आहे.

यास्तव, २०१८ चा एकरुप परिनियम क्रमाक ३ मधील ३(२) अन्वये मा. कुलपती महोदय यांचेकडून शिफारस प्राप्त झालेनंतर सदर शिफारस व्यवस्थापन परिषदे समोर ठेवावी लागणार आहे.

सबब, डॉ. विश्वनाथ कराड यांना डी. लिट (D.Lit.) या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबत अधिसभेस शिफारस करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **डॉ. विश्वनाथ कराड यांना डी. लिट (D.Lit.) या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबत अधिसभेस सर्वानुमते शिफारस करण्यात आली.** |

**विषय क्र. १२(२)** **कौशल्य विकास केंद्र अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील Diploma in Cyber Law संदर्भात विद्यार्थ्यांनी दिलेल्या तक्रार अर्जावर मा. कुलगुरु महोदयांनी नियुक्त केलेल्या चौकशी समितीचा अहवाल स्वीकारुन महाविद्यालयास दंड आकारण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: Diploma in Cyber Law या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सदर कोर्स हा टेक्नीकल कोर्स असल्याने आम्हाला त्या संदर्भात कोणतेही प्रकारचे ज्ञान अवगत झालेले नाही तरी आमची परीक्षा घेण्यात आली आहे अशी तक्रार दिली होती.

सदरील तक्रारीच्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ नुसार चौकशी समितीचे गठन करण्यात आले होते. सदर चौकशी समितीने दि.०३/०९/२०२२ रोजी घेतलेल्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या तक्रारी अर्जाबाबत सदस्यांनी विचार विनिमय करुन सर्व तक्रारदार विद्यार्थी व संबंधित प्राचार्यांना समक्ष बोलावून शहानिशा करण्याबाबत ठरविले. त्याप्रमाणे दि.१२/०९/२०२२ रोजी चौकशी समितीची दुसरी बैठक संपन्न झाली. या बैठकीस उपस्थित कॉलेजचे प्रतिनिधी डॉ. एस. जे. गायकवाड यांनी सादर केलेली कागदपत्रे तसेच बैठकीस उपस्थित तक्रारदार विद्यार्थी १. श्री मुजावर अशरफ शब्बीरअहमद २.श्रीमती कडेचूर फरजाना एम. शकील ३. श्रीमती पतंगे सुलेखा सुहास यांचे तोंडी व लेखी म्हणणे जाणून घेतले.

सदर बैठकीअंती महाविद्यालय व तक्रारदार विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेवून समितीने खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.

अ) डी.जी.बी. दयानंद लॉ कॉलेज, सोलापूर यांनी Diploma in Cyber Law या अभ्यासक्रमासंदर्भात पुरेसे ऑनलाईन व ऑफलाईन तसेच प्रात्यक्षिक अनुभवाकरिता आवश्यक असलेले वर्ग न घेतल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

ब) शिफारस मुद्दा क्र. अ. यास अनुसरुन समितीने १. श्री मुजावर अशरफ शब्बीरअहमद २. श्रीमती कडेचूर फरजाना एम. शकील ३. श्रीमती पतंगे सुलेखा सुहास व इतर ०३ तक्रारदार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून तसेच त्यांना आर्थिक झळ बसू नये याकरिता शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये सदरील विद्यार्थ्यांना महाविद्यालयात Diploma in Cyber Law या अभ्यासक्रमाकरिता निशुल्क प्रवेश देण्यात यावा. सदरील विद्यार्थ्यांकडून कोणतेही प्रवेश, अध्यापन व परीक्षा शुल्क स्वीकारण्यात येवू नये. प्रवेश व त्यासंबंधीत शुल्क याची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयाचे प्राचार्य यांची राहील.

क) संलग्निकरणावेळी आपणास विद्यापीठाने दिलेल्या नियम व सूचनांचे पालन झाले नाही म्हणून आपणास रु. १०,०००/- (दहा हजार रुपये) दंड आकारण्यात येत आहे. आपण सदर दंडाची रक्कम विद्यापीठाकडे जमा करावी व तक्रारदार विद्यार्थ्यांना वर नमूद केलेल्या अटींचे पालन करावे.

ड) तक्रारदार विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये नियमित अध्यापन करुन परिक्षेकरिता बसण्यास संधी उपलब्ध करुन देण्यात यावी.

ई) डी.जी.बी. दयानंद लॉ कॉलेज, सोलापूर यांनी पुढील काळात कौशल्य विकास केंद्राच्या अभ्यासक्रमासंदर्भात विद्यापीठाने घालून दिलेल्या नियमांचे तंतोतंत पालन करावे व जर नियमांचे उल्लंघन झाल्यास शिस्तभंगाची कार्यवाही म्हणून कौशल्य विकास केंद्राने आपल्या महाविद्यालयास दिलेल्या सर्व अभ्यासक्रमांचे संलग्निकरण कायमस्वरुपी रद्द करण्यात यावी, अशी शिफारस समितीने केली.

सबब, कौशल्य विकास केंद्र अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील Diploma in Cyber Law संदर्भात विद्यार्थ्यांनी दिलेल्या तक्रार अर्जावर मा. कुलगुरु महोदयांनी नियुक्त केलेल्या चौकशी समितीचा अहवाल स्वीकारुन महाविद्यालयास दंड आकारण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **कौशल्य विकास केंद्र अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील Diploma in Cyber Law संदर्भात विद्यार्थ्यांनी दिलेल्या तक्रार अर्जावर मा. कुलगुरु महोदयांनी नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेबाबत कायदेशीर सल्ला घ्यावा व महाविद्यालयाकडून सदरबाबत त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात घेऊन त्यानुसार पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.** |

विषय क्र. १२(३) **दि.२८/११/२०२२ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.२८/११/२०२२ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**

टिपणी: दि.२८/११/२०२२ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No..३२४ नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. दि.२८/११/२०२२ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि.२८/११/२०२२ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **दि.२८/११/२०२२ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.२८/११/२०२२ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र. १२(४)** **Maharashtra State Faculty Development Academy भाग वर्गणीकरिता रुपये ०१ लक्ष व ०४ कार्यक्रम आयोजनासाठी प्रत्येकी रुपये ०६ लक्ष याप्रमाणे रुपये २४ लक्ष असे एकूण रुपये २५ लक्ष इतकी तरतूद विद्यापीठाच्या सुधारीत अंदाजपत्रकात करण्याबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: Maharashtra State Faculty Development Academy यांचे दि.३०/०७/२०२२ रोजीचे पत्र या विभागाकडे दि.२८/११/२०२२ रोजी ई-मेलद्वारे प्राप्त झाले आहे व ते सोबत जोडले आहे. पत्रात नमूद केल्याप्रमाणे MSFDA ची स्थापना कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ८ नुसार झाली असुन त्याची भाग वर्गणी रु.५० हजार ते रु. ६.०० लक्ष या दरम्यान देण्याबाबत विनंती केली आहे.

तसेच सदर संस्थेचे कार्यक्रम विद्यापीठात आयोजित केल्यास त्यासाठी झालेल्या खर्चाचा परतावा MSFDA कडून होणार असल्याने भाग वर्गणी (अंदाजे रु. ०१ लक्ष) व कार्यक्रम आयोजन खर्चाकरिता रु. ६.०० लक्ष प्रती कार्यक्रम याप्रमाणे ०४ (अंदाजे रु. २४ लक्ष) कार्यक्रमासाठी एकूण रुपये २५ लक्ष इतकी तरतुद विद्यापीठाच्या अंदाजपत्रात करणे आवश्यक आहे. दि.२८/११/२०२२ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| ठराव | उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार MSFDA भाग वर्गणीकरिता रुपये ०१ लक्ष व ०४ कार्यक्रम आयोजनासाठी प्रत्येकी रुपये ०६ लक्ष याप्रमाणे रुपये २४ लक्ष असे एकूण रुपये २५ लक्ष इतकी तरतूद विद्यापीठाच्या सुधारीत अंदाजपत्रकात करण्याबाबत मान्यता देवून व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली. |

सबब, उपरोक्त दि.२८/११/२०२२ रोजीच्या ठरावाप्रमाणे वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **Maharashtra State Faculty Development Academy भाग वर्गणीकरिता रुपये ०१ लक्ष व ०४ कार्यक्रम आयोजनासाठी प्रत्येकी रुपये ०६ लक्ष याप्रमाणे रुपये २४ लक्ष असे एकूण रुपये २५ लक्ष इतकी तरतूद विद्यापीठाच्या सुधारीत अंदाजपत्रकात करण्याबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. १२(५)** | **प्रस्तुत विद्यापीठातील नियमित पदावर कार्यरत असलेले वाहनचालकांना गोपनिय भत्ता शासकीय नियमाप्रमाणे अनुज्ञेय नसल्याने विषय अमान्य करण्याबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

टिपणी: विद्यापीठातील नियमित असलेले वाहनचालक यांनी दि.१७/११/२०२२ रोजीच्या निवेदन पत्रान्वये आम्हा वाहनचालकांना कार्यालयीन वेळेचे बंधन न राखता रात्री, अपरात्री, पहाटे कधीही सेवा द्यावी लागते, येणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात, या सर्व बाबी लक्षात घेवून गोपनीय भत्ता द्यावा अशी विनंती केली आहे. सर्व निवेदनपत्रावर आस्थापना विभागाने दि.२८/११/२०२२ रोजी टिपणी सादर केली असता त्यावर वित्त व लेखा विभागाचे अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करण्याबात मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिली आहे.

सदर प्रस्ताव वित्त व लेखा विभागाकडे आवक झाल्यानंतर त्यावर मा. वित्त व लेखा अधिकारी यांनी दि.२८/११/२०२२ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीमध्ये सदरचा विषय सादर करण्याबाबत निर्देशित केले आहे. त्यानुसार दि.२८/११/२०२२ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव | उपरोक्त विषयाबाबत समितीमध्ये सविस्तर चर्चा होऊन सदर गोपनीय भत्ता शासकीय नियमाप्रमाणे अनुज्ञेय नसल्याने विषय अमान्य करण्याबाबत मान्यता देऊन व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

सबब, उपरोक्त दि.२८/११/२०२२ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या ठरावाप्रमांणे वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठातील नियमित पदावर कार्यरत असलेले वाहनचालकांना गोपनिय भत्ता शासकीय नियमाप्रमाणे अनुज्ञेय नसल्याने विषय अमान्य करण्याबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र. १२(६)** **Foundation Day and Other Function या अंदाजपत्रकीय शिर्षकामध्ये अधिकचे तरतुद करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: आस्थापना विभागांतर्गत Foundation Day and Other Function हे अंदाजपत्रकीय शिर्षक असून त्यामध्ये आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता करण्यात आलेली तरतुद व ऑक्टोबर, २०२२ पर्यंत झालेला खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अंदाजपत्रकिय शिर्षक | अंदाजपत्रकिय तरतुद | ऑक्टोंबर, २०२२ पर्यंत झालेला खर्च |
|---|---|---|
| Foundation Day and Other Function | 8,00,000/- | 4,03,360/- |

अभियांत्रिकी विभागाकडून दि.२८/११/२०२२ रोजीच्या टिपणीन्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे पुतळा अनावरण समारंभासाठी अंदाजे रु. १० लाख खर्च अपेक्षित असून, त्याकामी होणारा खर्च विचारात घेता, Foundation Day and Other Function या अंदाजपत्रकीय लेखाशिर्षकाचे पुनर्नियोजन करणेबाबत कळविलेले आहे. त्यास अनुसरुन Foundation Day and Other Function या अंदाजपत्रकिय लेखाशिर्षकामध्ये रु. ८ लाखाचे रु. १८ लाख पुर्ननियोजन करणे आवश्यक आहे.

सदर वाढीव अंदाजपत्रक हे मूळ अंदाजपत्रकापेक्षा जास्त असल्याने त्यास वित्त व लेखा समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार दि.२८/११/२०२२ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीमध्ये सदरचा विषय ठेवला असता Foundation Day and Other Function या अंदाजपत्रकीय लेखाशिर्षकाचे रु.८ लाखाचे रु.१८ लाख पुनर्नियोजन करण्याबाबत खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे पुतळा अनावरण समारंभासाठी होणारा खर्च अंदाजे रु. १० लक्ष विचारात घेवून वाढीव खर्चास व त्यासाठी Foundation Day and Other Function या अंदाजपत्रकीय लेखाशिर्षकाचे रुपये १८ लक्ष असे पुर्ननियोजन करण्यास तसेच त्यासाठी इच्छुक देणगीदाराकडून देणगी घेण्यास मान्यता देवून व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

सबब, उपरोक्त दि.२८/११/२०२२ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या ठरावाप्रमाणे वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **Foundation Day and Other Function या अंदाजपत्रकीय शिर्षकामध्ये अधिकची तरतुद करण्यास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. १२(७)** | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवाकरिता आयोजक महाविद्यालयास देण्यात येणाऱ्या रु.१,२५,०००/- अनुदानाची बाब विचारार्थ.** |

टिपणी: विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी व त्यांचे संशोधन समाजापुढे आणण्याकरिता दरवर्षी विद्यापीठस्तरीय, आंतरविद्यापीठीय व राज्यस्तरीय संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. प्रथम विद्यापीठस्तरावर अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करुन राज्यस्तरीय स्पर्धेकरिता संघाची निवड केली जाते. यास्तव, विद्यापीठस्तरावर आविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी सर्व प्राचार्या/प्राचार्य, सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थांना विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव आयोजन करणेबाबत प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात येते. विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी येणारा खर्च हा जवळपास अंदाजे रु.१,५०,०००/- इतका येतो. तरी विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाकरिता मा. कुलगुरु महोदयांनी अनुदान म्हणून प्रत्येक वर्षासाठी रु.१,२५,०००/- फक्त देण्यास मान्यता दिली आहे.

सबब, विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवाकरिता आयोजक महाविद्यालयास देण्यात येणाऱ्या अनुदानाची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवाकरिता आयोजक महाविद्यालयास देण्यात येणाऱ्या रु.१,२५,०००/- अनुदानास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र. १२(८)** **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ५७(२) नुसार क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळावर अ. क्र. ५ व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागातील नामनिर्देशित केलेले एक अध्यापक व अ. क्र. ६ अन्वये व्यवस्थापन परिषदेने संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालयामधून नामनिर्देशन केलेले दोन क्रीडा अध्यापक नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ५७(२) नुसार क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळामध्ये पुढील सदस्यांचा समावेश आहे.

| | |
|---|---|
| १) | कुलगुरु- अध्यक्ष |
| २) | प्र-कुलगुरु |
| ३) | विविध क्रीडा क्षेत्रातील विश्वसनीयता सिध्द केलेले, कुलगुरुंनी नामनिर्देशन केलेले तीन व्यावसायिक |
| ४) | ज्या जिल्हामध्ये विद्यापीठाचे मुख्यालय आहे त्या जिल्हाचा जिल्हा क्रीडा अधिकारी |
| ५) | व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागातील नामनिर्देशित केलेले एक अध्यापक |
| ६) | व्यवस्थापन परिषदेने संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालयामधून नामनिर्देशन केलेले दोन क्रीडा अध्यापक |
| ७) | एक वर्षाचा पदावधी असलेला क्षेत्रीय किंवा विभागीय अध्यक्ष (प्रमुख महाविद्यालयाचा प्राचार्य) व सचिव (प्रमुख महाविद्यालयाचा शारीरिक शिक्षण संचालक) |
| ८) | विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष - सचिव |
| ९) | कलम ९९, पोट कलम (४), उप-खंड (ख) च्या उप-पोट-खंड (पाच) अन्वये, विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्षाने विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्षाने विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या क्रीडा क्षेत्रातून नामनिर्देशित केलेला एक विद्यार्थी सदस्य |
| १०) | संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग - सदस्य सचिव |

अ.क्र. ६ करिता व्यवस्थापन परिषदेच्या दि.३१/१०/२०१७ रोजीच्या ठराव क्र.२ अन्वये डॉ. किरण चोकाककर, डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स ॲन्ड सायन्स, सोलापूर व श्री. आनंद चव्हाण, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर यांचे नामनिर्देशन करण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६२ अन्वये विविध प्राधिकरणाची ५ वर्षाची मुदत संपलेली आहे. त्यानुसार डॉ. किरण चोकाककर, डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स ॲन्ड सायन्स, सोलापूर व श्री.आनंद चव्हाण, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर यांचा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळावरील नामनिर्देशित सदस्य म्हणून कार्यकाल संपला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ५७(२) नुसार क्रीडा

व शारीरिक शिक्षण मंडळाची समिती गठित करणे आवश्यक असल्याने वरील अ.क्र.५ नुसार व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागातील नामनिर्देशित केलेला एक अध्यापकाचे व अ.क्र. ६ नुसार व्यवस्थापन परिषदेने परिषदेने संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालयामधून नामनिर्देशन केलेले दोन क्रीडा अध्यापक असणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळावर अ. क्र. ५ व अ. क्र. ६ व्यवस्थापन परिषदेमार्फत नामनिर्देशन झाल्यास सदरील मंडळ गठित होते.

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ५७(२) नुसार क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळावर अ. क्र. ५ व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागातील नामनिर्देशित केलेले एक अध्यापक व अ. क्र. ६ अन्वये व्यवस्थापन परिषदेने संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालयामधून नामनिर्देशन केलेले दोन क्रीडा अध्यापक नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ५७(२) नुसार क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळावर अ. क्र. ५ व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागातील नामनिर्देशित केलेले एक अध्यापक व अ. क्र. ६ अन्वये व्यवस्थापन परिषदेने संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालयामधून नामनिर्देशन केलेले दोन क्रीडा अध्यापक नामनिर्देशन करण्याचे सर्वाधिकार मा.कुलगुरु महोदयांना देण्याचे सर्वानुमते ठरले. |

विषय क्र. १२(९) **प्रस्तुत विद्यापीठास गरजेनुसार कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक (कुशल व अर्धकुशल) घेण्याकरिता वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग विभाग यांच्या दरपत्रक समितीच्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु. ०१.०० या दराने दि.०४/१२/२०२२ पासून दि.०३/११/२०२३ या ११ महिन्याच्या कालावधीकरिता मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी ॲन्ड लेबर सप्लायर, नागपूर या खाजगी कंत्राटदारासोबत करारनामा केल्याबाबत व सुरक्षा ठेव बँक गॅरंटी स्वरुपात जमा करुन घेण्यात आली असून त्याअनुषंगाने त्यांना कंत्राटदारास पुरवठा आदेश देण्याची कार्यवाही करणेबाबतची बाब विचारार्थ.**

टिपणी: वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाने दि.१७/१०/२०२२ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक (कुशल व अर्धकुशल) पुरवठा करण्यासाठीचा ई-निविदाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. प्राप्त निविदापैकी न्युनतम दर असलेले फर्म मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी ॲन्ड लेबर सप्लायर, नागपूर यांना निश्चित करण्यात आले आहे असे नमूद करुन सदरचा प्रस्तावास मा. प्र. कुलगुरु महोदय यांची दि.१७/१०/२०२२ रोजी मान्यता घेवून आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह पुढील कार्यवाही करिता आस्थापना विभागास हस्तांतरीत केले आहे. तसेच संबंधित फर्मला दि.१७/१०/२०२२ रोजीच्या ई-मेलअन्वये दराची स्विकृती देणेबाबत कळविले आहे. सदर फर्मने दि.१७/१०/२०२२ रोजीच्या ई-मेलअन्वये दराबाबत स्विकृती कळविली आहे. त्यानुसार प्रथमत: मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी ॲन्ड लेबर सप्लायर, नागपूर या खाजगी कंत्राटदाराकडून भारतीय गैरन्यायिक मुद्रांक रुपये ५००/- वर करारनामा व अनामत रक्कम बँक गॅरंटी स्वरुपात जमा करुन घेण्याबाबत प्रशासकीय मान्यता घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठास गरजेनुसार कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक (कुशल व अर्धकुशल) घेण्याकरिता वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांच्या दरपत्रक समितीच्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु. ०१.०० या दराने दि.०४/१२/२०२२ पासून दि.०३/११/२०२३ या ११ महिन्याच्या कालावधीकरिता मे.अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी ॲन्ड लेबर सप्लायर, नागपूर या खाजगी कंत्राटदाराकडून सुरक्षा ठेव बँक गॅरंटी स्वरुपात जमा करुन घेण्यात आल्याबाबत व त्यांच्यासोबत करारनामा केल्याच्या अनुषंगाने त्यांना कंत्राटदारास पुरवठा आदेश देण्याची कार्यवाही करणेबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठास गरजेनुसार कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक (कुशल व अर्धकुशल) घेण्याकरिता वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग विभाग यांच्या दरपत्रक समितीच्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु. ०१.०० या दराने दि.०४/१२/२०२२ पासून दि.०३/११/२०२३ या ११ महिन्याच्या कालावधीकरिता मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी ॲन्ड लेबर सप्लायर, नागपूर या खाजगी कंत्राटदारासोबत करारनामा केल्याबाबत व सुरक्षा ठेव बँक गॅरंटी स्वरुपात जमा करुन घेण्यात आली असून त्याअनुषंगाने त्यांना कंत्राटदारास पुरवठा आदेश देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

विषय क्र. १२(१०) **दि.२९/११/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.**

टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि. २९/११/२०२२ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

विद्यापीठ परिनियम S. ३३९ (f) नुसार दि. २९/११/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, दि. २९/११/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | दि. २९/११/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

३०/११/२२
सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद